ज्ञान प्रबोधिनीचे, कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक

निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

# छात्र प्रबोधन

*मातृभूमि हे दैवत येथे स्थापियले, पूजिले । त्याग, पराक्रम, सेवा यांचे त्रिदल पदी वाहिले ॥*

मा.

ॐ

**दिनांक :** सौर आषाढ २०, शके १९४७
११ जुलै २०२५

सस्नेह नमस्कार,

छात्र प्रबोधनचे सौर चैत्र ते फाल्गुन शके १९४६ (एप्रिल २०२४ ते मार्च २०२५) चे वार्षिक वृत्त आपल्याला पाठवत आहोत. वर्षभरात मासिके, पुस्तक निर्मिती, स्पर्धा, उपक्रम या अंतर्गत विभागात विविध योजना, उपक्रम, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

हे वृत्त आपल्याला सादर करताना आनंद होत आहे. वृत्तावरील प्रतिसाद व येत्या वर्षातील संकल्पपूर्तीसाठी आपला सहभाग आणि योगदान भरभरून मिळावे यासाठी आवाहन!

**सस्नेह आपले**

| | | |
|---|---|---|
| **रूपाली बापट** | **शिल्पा कुलकर्णी** | **महेन्द्र सेठिया** |
| **व्यवस्थापकीय समन्वयक** | **संपादक** | **विभाग प्रमुख, छात्र प्रबोधन** |
| ९४२२९१०९३७ | ९८८१७४४४०६ | ९४०४२२४७०५ |

**संपर्क - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०, ☎०२०-२४२०७ १७४/२४०**
www.chhatraprabodhan.org, Email-chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

# शके १९४६ - छात्र प्रबोधन वार्षिक वृत्त

## (सौर चैत्र ते फाल्गुन शके १९४६/एप्रिल २०२४ ते मार्च २०२५)

❖ **मासिक अंक –** गेल्या वर्षभरात छात्र प्रबोधनचे चैत्र/एप्रिल ते फाल्गुन/मार्च या महिन्यात १ वासंतिक विशेषांक व १० नित्य अंक प्रकाशित झाले. सुबोध-ग्रामीण चा १ वासंतिक अंक व ३ द्वैमासिक अंक प्रकाशित झाले. एप्रिल २०२४ रोजी 'इ'-इंग्रजी प्रायोगिक अंक प्रकाशित झाला तर जून/जुलै, ऑगस्ट/सप्टेंबर, डिसेंबर/जानेवारी चे छापील इंग्रजी द्वैमासिक अंक प्रकाशित झाले.

मे-जून या सुट्टीच्या काळात विद्यार्थ्यांना संपादकीय कामाचा अनुभव मिळावा, गटात काम करता यावं, मासिक छपाईची प्रक्रिया समजून घेता यावी यासाठी विद्यार्थ्यांना संपादक मंडळात सहभागी होण्यासाठी आवाहन केले होते. त्याला ५ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या साहित्यकृतींनी नटलेला, विद्यार्थ्यांनी संपादित केलेला सौर आषाढ/जुलै महिन्याचा अंक हा 'विद्यार्थी विशेषांक' म्हणून प्रकाशित झाला. इ. १० वी- १२ वीच्या ४ विद्यार्थ्यांनी या विशेषांकाचे काम बघितले. विद्यार्थी विशेषांकाकरिता मेधज करमरकर, प्रथमेश माणकीकर, मृण्मयी पाटसकर, शर्वणी खोडके या विद्यार्थी मंडळाने अंकाचे काम बघितले.

**वर्गणीदार संख्येत वाढ – नित्य मासिक –** एका शाळेतून ५० पेक्षा जास्त सभासद नोंदणी केल्यास सवलतीत रु. १००/- मध्ये (मूळ वर्गणी रु. ३००/-) वर्षभराचे अंक शाळेत एकत्रितपणे पाठविले जातील अशी योजना जाहीर केली होती. या योजनेतून १४ शाळांमधून १०४७ सभासद झाले. **सुबोध द्वैमासिक –** एका शाळेतून २५ पेक्षा जास्त सभासदनोंदणी केल्यास सवलतीत रु. ५० मध्ये (मूळ वर्गणी रु. १५०/-) सुबोध ग्रामीण वर्षभरात ५ अंक पाठविले जातील अशी योजना होती. या योजनेतून ९ शाळांमधून १००२ सभासद झाले. इंडियन रूटस्, अमेरिका यांच्या आर्थिक सहयोगातून ही सवलत देण्यात आली आहे.

❖ **दिवाळी अंक व कुमारांसाठी दिनदर्शिका –** छात्र प्रबोधनचा नित्य दिवाळी अंक, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सुबोध दिवाळी अंक आणि इंग्रजी दिवाळी अंक प्रकाशित झाले. त्याचबरोबर खास कुमारांसाठी दिनदर्शिका - २०२५ (वर्ष नववे) प्रकाशित झाली. मराठी नित्य - १२,०००, सुबोध ग्रामीण अंक - १३,०००, इंग्रजी दिवाळी अंक - ५,५०० असे एकूण ३०,५०० दिवाळी अंक व ८,००० दिनदर्शिका छापल्या. त्यापैकी महाराष्ट्रातून एकूण ६० केंद्रांनी व ४० शाळांनी मिळून २९,००० अंकांची व ७,००० दिनदर्शिकांची प्रकाशनपूर्व नोंदणी केली. त्यापैकी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी मिळून ६५०० अंकांची व दिनदर्शिकांची प्रकाशनपूर्व नोंदणी केली. २२ व २३ ऑक्टोबर या दोन दिवसात सर्व केंद्र व प्रबोधनदूत योजनेतील सर्व शाळांना अंक व दिनदर्शिकेचे वितरण करण्यात आले. यावर्षी कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई अशा तीन मार्गांवरून अंकांचे वितरण झाले. ज्ञान प्रबोधिनीमधून शैक्षणिक संशोधन संशोधिका, नेतृत्त्व संवर्धन केंद्र, नैसर्गिक संसाधने या विभागांच्या साहचर्याने हे वितरण झाले.

# एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ मधील नित्य अंक



# सुबोध ग्रामीण द्वैमासिक




# इंग्रजी द्वैमासिक




# ३ दिवाळी अंक




# कुमारांसाठी दिनदर्शिका



# पुस्तक प्रकाशने









पुस्तक विक्री



जोडीकार्य उपक्रम

## ❖ पुस्तक निर्मिती व विक्री –

### १. पूर्व प्रकाशित पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या/पुर्नमुद्रणे –

१) **रस्काझी** – प्रथम आवृत्तीचे पुनर्मुद्रण पहिले (प्रती १०००)

२) **कागदी हस्तकलेच्या दुनियेत** – प्रथम आवृत्तीचे पुनर्मुद्रण पहिले, (प्रती १०००)

३) **नियोजन कौशल्य** – प्रथम आवृत्तीचे पुनर्मुद्रण दुसरे (एकूण छापलेल्या प्रती ३,०००)

४) **उजळती वाट** – प्रथम आवृत्तीचे पुनर्मुद्रण दुसरे, (एकूण छापलेल्या प्रती ३,००० )

५) **असे घटते सुंदर अक्षर** – पुनर्मुद्रण सतरावे, (एकूण छापलेल्या प्रती ५४,०००)

६) **अभ्यासाची पूर्वतयारी** – द्वितीय आवृत्तीचे पुनर्मुद्रण पहिले, (एकूण छापलेल्या प्रती ३,०००)

७) **स्वीकारशील स्वदेशी** – द्वितीय आवृत्तीचे पुनर्मुद्रण पहिले (एकूण छापलेल्या प्रती ४,०००)

८) **पंख फुलवूया प्रतिभेचे** – पहिल्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण पहिले (एकूण छापलेल्या प्रती २०००)

९) **पाहिलेच पाहिजे भाग १** – पहिल्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण पहिले, (एकूण छापलेल्या प्रती २०००)

**२. इंग्रजी अनुवाद–** आत्तापर्यंत ९ इंग्रजी पुस्तके आपण प्रकाशित केली असून त्याव्यतिरिक्त सुमारे १० मराठी पुस्तकांचा इंग्रजी अनुवाद करण्याचे काम वेगाने सुरू आहे. लवकरच ही पुस्तके प्रकाशित होतील.

**३. आगामी प्रकाशने–** छात्र प्रबोधनमध्ये पूर्वप्रकाशित १५ एकांकिकांची एकूण मिळून ८ पुस्तके (प्रत्येकी १६ पानी) प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. तसेच 'वनस्पतींचे अनोखे विश्व' या पुस्तकाची आवृत्ती संपली आहे. नवीन २ भागांमध्ये या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

**⁕ पुस्तक प्रदर्शन व विक्री –** वर्षभरात ज्ञान प्रबोधिनी प्रकाशनांचे पुस्तक प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल्स लावण्यात आले. 'झेप' अंतर्गत ऑक्टोबर महिन्यात एक दिवसीय पिंपरी चिंचवड, डिसेंबर महिन्यात 'नॅशनल बुक ट्रस्ट', दिल्ली अंतर्गत फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे ९ दिवस, मराठी विश्व संमेलन, राज्यस्तरीय शिक्षण परिषद, राज्यस्तरीय मनाचे श्लोक स्पर्धा, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला पुणे इ. ५ वी प्रवेश परीक्षा इ. ठिकाणी ज्ञान प्रबोधिनी प्रकाशनांची विक्री करण्यात आली. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने अधिकाधिक वाचकांपर्यंत पुस्तके पोहचवू शकलो याचा आनंद निश्चित आहे.


**⁕ नवीन 'पुस्तक विक्री केंद्र' :** ज्ञान प्रबोधिनी प्रकाशने-विक्री केंद्रे महाराष्ट्रात अंबाजोगाई, अकोला, पुणे, इचलकरंजी, परभणी या ठिकाणी यापूर्वीच सुरू झाली आहेत. त्यात नाशिक व बदलापूर येथील केंद्रांची नव्याने भर पडली. ही धरून महाराष्ट्रात एकूण ७ ठिकाणी विक्री केंद्र कार्यरत आहेत. आपणही आपल्या गावांत, परिसरातील परिचित पुस्तक विक्रेत्यांकडे 'पुस्तक विक्री केंद्र' ही योजना नक्की पोहोचवावी.

## ❖ उपक्रम, योजना, स्पर्धा –

**१. जोडीकार्य उपक्रम :–** आपापल्या गावात राहून सुट्टीच्या काळात विद्यार्थ्यांनी छोटी-मोठी आव्हाने घ्यावीत, त्यातून त्यांचे अनुभव शिक्षण व्हावे व त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी छात्र प्रबोधन तर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एप्रिल महिन्यात दूरस्थ जोडीकार्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांमध्ये सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करणे, कच्च्या मालावर काही प्रक्रिया करून त्याची विक्री करणे, वंचित गटातील व्यक्तींशी गप्पा मारणे, पारंपरिक पदार्थ शिकून घेऊन बनवणे, विविध माध्यमांतून गटासमोर अभिव्यक्ती सादर करणे असे जोडीकार्याचे स्वरूप होते. विद्यार्थ्यांनी समन्वयकांना फोन करून पहिले जोडीकार्य समजून घ्यायचे व ते पूर्ण झाल्यावर समन्वयकांना सांगायचे. ते काम योग्य प्रकारे



कुमार साहित्य मेळावे



घरोघरी ग्रंथालय

पूर्ण झाल्याची समन्वयकाची खात्री पटली की ते पुढचे काम त्यांना सांगायचे. अशा प्रकारे महिन्याभरात ५ कामे त्यांनी पूर्ण करायची होती.

या उपक्रमात ३० शाळांमधून एकूण ५४ जोड्यांनी १ किंवा त्याहून अधिक जोडीकार्ये पूर्ण केली. त्यातील २२ जोड्यांनी पाचही कार्ये पूर्ण केली व त्यांना 'जिद्दीची गुरूकिल्ली' व 'जिद्दीची लोभस रूपे' ही दोन पुस्तके व प्रशस्तिपत्रक बक्षीस म्हणून देण्यात आले. या उपक्रमासाठी १० जण समन्वयक म्हणून कार्यरत होते.

**२. प्रबोधन ऐपावाक (वर्ष पाचवे)–** १ मे ते ३१ मे २०२४ या कालवधीत 'प्रबोधन ऐपावाक' (ऐका–पाहा–वाचा–करा) या सुट्टीतल्या उपक्रमात एकूण २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना 'ऐका–पाहा–वाचा' पैकी रोज एक साहित्य आणि एक 'करा ची कृती छात्र प्रबोधन ॲपद्वारे पाठविली गेली. सामाजिक जाणीव, कल्पकता, विक्री, निरीक्षण कौशल्यं वाढवणाऱ्या तसेच पर्यावरण पूरक कृती करायला दिल्या होत्या. या उपक्रमात एकूण ३० विद्यार्थ्यांनी मिळून २३३ गुगल फॉर्म पाठवले. या स्पर्धेत ३ विद्यार्थ्यांनी १५ पेक्षा जास्त गुणवत्तापूर्ण कृती करून विशेष कामगिरी केली. त्यांना बक्षीसेही पाठवली.

दि. २५ मे २०२४ रोजी 'प्रबोधन ऐपावाक' उपक्रमांतर्गत झूम द्वारे कर्तृत्ववान व्यक्तींशी गप्पांचा कार्यक्रम झाला. पॅरा ॲथलेट मा. सचिन खिलारी यांच्याशी विद्यार्थ्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या कार्यक्रमाला २५ विद्यार्थी उपस्थित होते.

**३. गावोगावी ग्रंथालये :** प्रबोधन दूत योजनेतील ५० शाळांमधील २०० विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रात आपापल्या गावात/भागात एकूण २०० ग्रंथालये सुरू केली. या सर्वांना 'छात्र प्रबोधन' तर्फे प्रत्येकी १२ ते १५ अंकांचा संच देण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडच्या पुस्तकांची भर घालावी आणि सुट्टीत १०–१५ मित्र –मैत्रिणींना जमवून आपापल्या घरात ग्रंथालय चालवावे, अशी त्यामागील संकल्पना होती. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहात ग्रंथालये सुरू केली आहेत. सुट्टीत अशी २०० ग्रंथालये सुरू होती.

**४. जिज्ञासा ग्रंथालय स्पर्धा –** विद्यार्थ्यांमध्ये वाचनाविषयी, साहित्याविषयी कुतूहल, उत्सुकता वाढावी व त्यांच्यातील **जि**द्द, **ज्ञा**न आणि **सा**हस या तीन गुणांचा विकास व्हावा यासाठी **जिज्ञासा** ग्रंथालय योजना गेले वर्षभर राबवत आहोत. या योजनेमध्ये एकूण ४५ शाळांनी सहभाग नोंदवला होता. त्यातून जिज्ञासा ग्रंथालय स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळांपैकी ३ शाळांनी स्पर्धा पूर्ण करून शाळेतील निवडक विद्यार्थ्यांच्या वह्या अंतिम परीक्षणासाठी पाठवल्या होत्या. शालेय स्तरावर ५ तर राज्यस्तरावर ३ विद्यार्थ्यांची निवड झाली व त्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र पाठवण्यात आली.

**५. वर्गोद्दिष्ट स्पर्धा –** सौर आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, अग्रहायण या महिन्यात अनुक्रमे सामुहिक भजन, प्रसंग नाट्य सादरीकरण, नवीन समूहनृत्य, विक्रीतून नफा, छोट्या दोस्तांसाठी गंमत यात्रा, सायकल सहल या वर्गोद्दिष्ट स्पर्धा झाल्या. या स्पर्धांमध्ये बक्षिसपात्र ५ वर्गांना प्रत्येकी रु. १०००/– ची बक्षिसे पुस्तकरूपाने तर उत्तेजनार्थ १ वर्गाला ५०० रुपयांचा पुस्तकसंच पाठविण्यात आला. पुणे, सातारा, कोल्हापूर, लातूर, सोलापूर या गावांमधील विद्यार्थी बक्षिसपात्र ठरले आहेत.

**६. कुमार साहित्य मेळावे –** विद्यार्थ्यांची वाचनाची गोडी वाढावी, त्यायोगे त्यांची साहित्य अभिरुची वाढावी, विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या माध्यमातून अभिव्यक्त होण्याची संधी मिळावी, गटासमोर सादरीकरण करताना त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी साहित्य मेळावे हा उपक्रम योजला जातो. डिसेंबर महिन्यात डोंबिवली–शिवाई बालक मंदिर, चिपळूण व पोखळी छात्र प्रबोधनच्या चिपळुण केंद्राचे केंद्रप्रमुख माधव मुसळे यांच्या समन्वयाने व पुढाकाराने या मेळाव्यांचे आयोजन झाले होते. जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यात महाराष्ट्रभरात **६ शाळांमध्ये** कुमार साहित्य मेळावे घेण्यात आले. हे मेळावे छात्र प्रबोधन विभागातील सर्व सदस्यांनी मिळून घेतले.

पद्य, प्रकट वाचन, मौन वाचन, भाषिक खेळ, कवितेला चाल लावणे, कथापूर्ती, निरीक्षण कौशल्य, रसग्रहण या विषयांभोवती




लेखन - अभिवाचन निवासी कार्यशाळा



हस्तलिखित - अभिवाचन स्पर्धा बक्षीस समारंभ

हे मेळावे घेतले गेले. या सर्व मेळाव्यांमध्ये सुमारे ४२५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**७. लेखन–अभिवाचन निवासी कार्यशाळा –** मे महिन्यात मुलांसाठी दि. २९ मे ते ३१ मे २०२४ या कालावधीत लेखन–अभिवाचनाची ३ दिवसांची निवासी कार्यशाळा ज्ञान प्रबोधिनीच्या वेल्हे येथील शिवप्रदेश भवनमध्ये पार पडली. या कार्यशाळेत पुणे, आंबेजोगाई, हराळी, बेळगाव, नाशिक, जळगाव, ठाणे इ. गावातून इयत्ता ७, ८ वी ९ वीचे ३३ विद्यार्थी सहभागी झाले होते. लेखक–संपादकांशी गप्पा, कविता लेखन, कथा लेखन, व्यक्तिचित्रण, प्रवासवर्णन, गद्य व पद्य अभिवाचन कसे करावे ? या विषयांवर मा. आश्लेषा महाजन, मा. संगीता बर्वे, मा. स्वाती ताडफळे, मा. अक्षय वाटवे, मा. महेन्द्रभाई यांची सत्रे झाली. अक्षयदादा सोडून सर्वजण विद्यार्थ्यांसोबत निवासी होते, त्यामुळे विद्यार्थ्यांबरोबर अनौपचारिकपणे मनमोकळ्या त्यांच्या गप्पा झाल्या. या सर्व सत्रांमध्ये मुलांचा उत्स्फूर्त, उत्साहपूर्ण सहभाग होता. दि. ३० मे रोजी संध्याकाळी वेल्हे गावाचा फेरफटका, रात्री जेवणानंतर आकाश दर्शन तर दि. ३१ मे रोजी पहाटे मुलांची तोरणागडावर सहल झाली. साहित्य, कला, सादरीकरण याबरोबर गिरिभ्रमणाचाही आनंद विद्यार्थ्यांनी लुटला.

**८. राज्यस्तरीय हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धा बक्षीस समारंभ २०२५ –** दरवर्षीप्रमाणे ज्ञान प्रबोधिनी–छात्र प्रबोधन, पुणे व मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धा व हस्तलिखित स्पर्धा आयोजित केल्या होत्या. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याची गोडी वाढावी, सुप्त गुणांना, प्रतिभेला वाव मिळावा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढावा या हेतूने दोन्ही स्पर्धांचे आयोजन केले जाते.

अभिवाचन स्पर्धेत एकूण ३० संघांनी नोंदणी केली होती, त्या पैकी २१ संघ अभिवाचन स्पर्धेमध्ये सहभागी झाले, त्यापैकी १३ संघ किमान अपेक्षित निकषानुसार पात्र ठरले. या १३ संघांपैकी ५ संघांना बक्षिसे देण्यात आली. या वर्षी प्रथमच ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी ह्या दोन गटांत हस्तलिखित स्पर्धा घेण्यात आल्या. दोन्ही गट मिळून हस्तलिखित स्पर्धे साठी ४० संघांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ३६ हस्तलिखिते आली. त्यापैकी ५ वी ते ७ वी च्या ९ संघांना तर ८ वी ते १० वी च्या १२ संघांना बक्षिसे देण्यात आली.

पुणे, निगडी, बारामती, डोंबिवली, कराड, इचलकरंजी, चोपडा, बदलापूर, अहमदनगर, कणकवली, चाळीसगाव, लातूर येथील संघ मिळून एकूण सुमारे ५०० विद्यार्थी दोन्ही स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते.

यातील बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ सौर फाल्गुन १० शके १९४६, दि. १ मार्च २०२५ रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या प्रबोध सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी मा. अजयकुमार फुंदे (SCERT चे अधिकारी) व मा. किरण केंद्रे (किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक) हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. हस्तलिखित स्पर्धेच्या परीक्षक स्वाती दाढे व अभिवाचन स्पर्धेचे परीक्षक अक्षय वाटवे यांनी विद्यार्थ्यां समोर परीक्षणातून जाणवलेल्या विशेष गोष्टींचे रसग्रहण मांडले, काही चुकांचे दिग्दर्शनही केले. तसेच गुणवत्तावाढीसाठी अतिशय सोप्या रीतीने, छोट्या छोट्या क्लृप्त्या व लेखन व अभिवाचन कौशल्यांवर मार्गदर्शन केले. प्रशस्तिपत्रक, पुस्तके व सन्मानचिन्ह देवून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. प्रशस्तिपत्रकावर त्यांच्या–त्यांच्या हस्तलिखितांचे मुखपृष्ठ, अभिवाचनाचे प्रकाशचित्र छापले होते. तसेच QR code ला त्यांचे दुवेही जोडले होते. बक्षिसप्राप्त गटानेच बक्षिसांच्या रकमेतून पुस्तकांची निवड स्वत: केली. ती पुस्तके त्यांना बक्षीस म्हणून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनोगतातून अभिवाचन व हस्तलिखित करतानाचा प्रवास रंगतदारपणे मांडला.

मा. महेंद्रभाई सेठिया यांनी कार्यक्रमाचा समारोप करत सुट्टीतील उपक्रम, स्व–हस्तलिखिताचे विद्यार्थ्यांनी जाहीर अभिवाचन करावे यासाठीचे आवाहन, ‘विद्यार्थी विशेषांकाचे संपादन, सुट्टीमध्ये घरोघरी ग्रंथालय याबद्दल मार्गदर्शन केले.



प्रबोधन दूत निवासी शिबीर


वार्षिक संचालक भेट

कसाल(कणकवली), कराड, निगडी, पुणे येथून शिक्षक, पालक, विद्यार्थी मिळून १३० जण उपस्थित होते.

❖ **प्रबोधन दूत योजना –** जून २०२२ पासून सुरू झालेल्या प्रबोधन दूत योजनेचे हे यशस्वी ३ रे वर्ष. जून २०२४ पासून ३४ शिक्षकांची (झेप ५) नव्याने या योजनेत भर पडली. गेल्या वर्षातल्या आणि या वर्षी नव्याने भर पडलेल्या अशा एकूण १०० प्रबोधन दूतांना (भरारी, उत्कर्ष, झेप) पुस्तकांचा संच पाठविण्यात आला. या गटांच्या दरमहा एक अशा ४ ऑनलाइन बैठका स्वतंत्रपणे घेण्यात आल्या. दिलेल्या पुस्तकांच्या आधारे मुलांसाठी उपक्रम कसे घ्यायचे याबाबत ऑनलाइन बैठकींमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. झेप गटातील शिक्षकांसाठी वाचनाची गोडी वाढविण्यासाठीचे विविध उपक्रम, दिलेल्या साहित्याचा त्यासाठी कल्पकतेने कसा वापर करता येईल? वाचनवेग कसा काढायाचा, वाचन कौशल्य कसे विकसित करायचे, त्याला पूरक-पोषक अशा विविध स्पर्धा, उपक्रमांची माहिती या बैठकींमधून देण्यात आली. तर भरारी व उत्कर्ष दोन्ही गटांसाठी स्वयंविकासाचे विविध पैलू व त्यावर आधारित कृति कार्यक्रम यांबाबत मांडणी झाली. प्रत्येक बैठकीत साधारणपणे २५ ते ४५ शिक्षक उपस्थित होते. अनुपस्थित सदस्यांसाठी व्हॉटस्ॲप गटावर या बैठकींचे ध्वनीमुद्रण पाठवले गेले.

※ **प्रबोधन दूत निवासी शिबिर –** १० ते १२ जानेवारी रोजी वेल्हे येथे झालेल्या निवासी शिबिरात महाराष्ट्रातून वेगवेगळ्या भागातून झेप गटाचे ७ व भरारी गटाचे ५ असे एकूण १२ प्रबोधन दूत (शिक्षक) उपस्थित होते. या शिबिरात 'ज्ञान प्रबोधिनीची शिक्षण प्रणाली' – मा. महेंद्रभाई सेठिया, 'साहित्य मेळावे कसे घ्यावे' – शिल्पा कुलकर्णी, 'वाचन कौशल्य' – क्षमा दातार, 'अनुभव कथन' – बागेश्रीताई पोंक्षे यांची प्रेरणादायी सत्रे झाली.

※ **प्रबोधन दूत 'शिक्षक नेतृत्व' निवासी शिबिर –** या वर्षी प्रथमच प्रबोधन दूत योजनेतील शिक्षकांसाठी 'शिक्षक नेतृत्व विकसन' हा वर्ग सुरू करण्यात येत आहे. त्यामध्ये वर्षभरात ३ निवासी शिबिरे होणार असून याचे पहिले निवासी शिबिर प्रबोधिनीच्या शिवप्रदेश भवन, वेल्हे येथे २९ ते ३१ मे २०२४ दरम्यान पार पडले. यात १५ शिक्षकांचा सक्रिय सहभाग होता..! या निवासी शिबिरात नेतृत्व संकल्पना स्पष्ट करणाऱ्या काही सत्रांबरोबरच संवाद कौशल्य, गटबांधणी व गटकार्य अशा काही नेतृत्व कौशल्य प्रशिक्षणाच्या सत्रांचा देखील समावेश होता. या विषयांवर मा. शरदराव सुंकर, दीपक गुप्ते, महेंद्रभाई, सौगंध देशमुख यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले

पुढील ३ महिन्यांसाठी या शिक्षकांना ३ गृहपाठ दिले आहेत. **१.** शाळेतील एका उपक्रमाचे नियोजन व कार्यवाही करणे. **२.** शाळेतील गरजेच्या साहित्य खरेदीसाठी परिसरातील किमान १० जणांकडून एकूण मिळून रु. ५०००/– देणगी मिळवणे व साहित्य खरेदी करणे. **३.** सहकारी ५ शिक्षकांची सुट्टीच्या दिवशी परिसरातील एका सामाजिक प्रकल्पाला भेट घडवून आणणे.

यापुढे दरमहा गृहपाठाचा आढावा, शिबिराचा पाठपुरावा व नवीन विषयांची मांडणी यासाठी ऑनलाइन बैठक होईल. त्याचा प्रारंभ जुलै मध्ये होईल.

❖ **संकीर्ण –**

※ **वार्षिक संचालक भेट –** सौर वैशाख ६ दि. २६ एप्रिल २०२४ रोजी ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीशराव बापट यांनी दु. २.३० ते ५.३० या वेळेत विभागाला वार्षिक भेट दिली. आ. संचालकांनी 'प्रबोधनदूत' या योजनेतील शिक्षकांशी ऑनलाइन संवाद साधला व मार्गदर्शन केले. त्याला ४५ शिक्षक उपस्थित होते. संचालक भेटीच्या निमित्ताने प्रत्येक सदस्याने विभागातील काही कामांना टोक आणण्याचे ठरविले. त्यानुसार छात्र प्रबोधनचे ४ रंगी ४ पानी माहितीपत्रक तयार करणे, छात्र प्रबोधनच्या १ ते २४ वर्षांपर्यंतच्या लेखांची सूची अद्ययावत करणे, जाहिरातदारांची २५ वर्षांची सूची संकलित करणे, पुस्तकांच्या प्रकाशनाची व विक्रीची माहिती संकलित करणे इ. कामे पूर्ण केली. संपादकीय व व्यवस्थापकीय गटातील सदस्यांशी संचालकांनी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी प्रत्येक सदस्याने छात्र प्रबोधनला पुढील ३ वर्षात कुठे


दिवाळी मेळावा


विभागातील सदस्यांची सहल

पाहायला आवडेल, त्यात त्यांची भूमिका काय असेल अशा प्रश्नांच्या आधारे २ मिनिटाचे मनोगत व्यक्त केले. भेटीच्या उत्तरार्धात सर्व सदस्यांनी ‘तेजस्वी गतिशील संघटन’ हे पद्य म्हटले. युवक-युवतींचा छात्र प्रबोधन उपक्रमात वाढता सहभाग, सभासद वाढीसाठी कसे प्रयत्न व्हावेत, आशयाचा दशवार्षिक भवितव्यलेख, संघटन इ. बाबत मा. संचालकांनी एकत्रित मार्गदर्शन केले. मा. महेन्द्रभाईंनी समारोप केला. प्रार्थना व अल्पोपाहाराने भेटीची सांगता झाली.

✻ **प्रतिज्ञा ग्रहण –** राष्ट्रीय सौर २६ ज्येष्ठ शके १९४६, १६ जून २०२४ रोजी युवती विभागाचा प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रम होता. एकूण १५ युवतींनी प्रतिज्ञा घेतली. छात्र प्रबोधन विभागातील शिल्पाताई कुलकर्णी व शुभदाताई कुलकर्णी यांनी प्रथम तर रूपालीताई बापट यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

✻ **वर्षारंभ उपासना जबाबदारी :** सौर आषाढ ८, २९ जून रोजी ज्ञान प्रबोधिनी पुणे केंद्राची वर्षारंभ उपासना झाली. वर्षारंभ उपासना व उपासनेनंतर झालेल्या सभेच्या नियोजन व कार्यवाहीची जबाबदारी छात्र प्रबोधन विभागाकडे होती. ती सर्वांनी मिळून उत्तमरितीने पार पाडली

✻ **कै. आप्पांच्या स्मृतिप्रित्यर्थ विभागात प्रदर्शन –**सौर श्रावण २८ रोजी ज्ञान प्रबोधिनीचे संचालक, संस्थापक कै. आप्पा पेंडसे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कै. आप्पांनी लिहिलेल्या किंवा आप्पांवर लिहिलेल्या पुस्तकांचे छोटेसे प्रदर्शन विभागात लावले होते. पुणे केंद्रातील जवळपास १५/२० सदस्यांनी छात्र प्रबोधन विभागात येवून कै. आप्पांच्या पुस्तकांचे मौन वाचन केले.

✻ **दिवाळी मेळावा –** दिवाळी अंकांची निर्मिती व अंक वेळेत गावोगावी पोहचवणे याचा आनंद अजून कुणाबरोबर तरी वाटावा या उद्देशाने गेल्या वर्षीपासून प्रबोधिनीतील अन्य विभागातील सदस्यांना बोलवून त्यांच्या बरोबर गप्पा व चहापानाचा कार्यक्रम असे योजले होते. यावर्षी प्रबोधिनीतील सर्व विभागातील आर्थिक कामकाज करणाऱ्या सदस्यांना आमंत्रित केले होते. गप्पांमधून दिवाळी अंकांच्या निर्मिती, वितरणाची रचना, विभागातील प्रकाशने, योजना त्यांना सांगणे तसेच त्यांच्याकडून त्यांचे अनुभव ऐकणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. यावेळी आलेल्या सर्व सदस्यांना एक दिवाळी अंक, सुगंधी उटणे आणि इचलकरंजीचे केंद्रप्रमुख गद्रे काका यांच्या सहकार्यातून बनलेली एक कापडी पिशवी भेट म्हणून देण्यात आली.

**सदस्यांसाठी उपक्रम –**

✻ **शुभेच्छा समारंभ –** छात्र प्रबोधन विभागात गेली २१ वर्षे कार्यरत असलेल्या श्रीमती माधवी दाते या १ जून २०२४ पासून त्यांच्या नित्य कामातून निवृत्त झाल्या. त्यांच्यासाठी योजलेल्या शुभेच्छा समारंभात त्यांना मा. महेन्द्रभाईंच्या हस्ते ‘कृतज्ञता पत्र’ देवून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विभागातील सदस्यांनी त्यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले. तसेच विभागातील सौ. शुभदा कुलकर्णी, सौ. अर्चना कुलकर्णी व सौ. रश्मी अस्वले या सदस्या काही वैयक्तिक अडचणींमुळे विभागात काम करायच्या थांबल्या

✻ **विभागातील सदस्यांची सहल :** सौर आषाढ ६, २७ जून रोजी छात्र प्रबोधन विभागातील १५ सदस्य शिवथरघळ येथे वर्षा सहलीसाठी गेले होते. मठामध्ये प्रबोधिनीची उपासना, ११ मनाचे श्लोक आणि १०८ वेळा रामनामाचा जप केला. तसेच ज्ञान प्रबोधिनी प्रकाशित ‘रामदास काय म्हणाले’ या पुस्तकातील उताऱ्याचे वाचन केले.

✻ **शुद्धलेखन कार्यशाळा –** सौर आषाढ २१ (१२ जुलै) रोजी मा. आश्लेषा महाजन यांनी विभागातील सदस्यांना ‘शुद्धलेखन म्हणजे काय, शुद्धलेखनाचे नियम व विरामचिन्हांचा वापर’ याविषयी कार्यशाळा घेतली. त्याला विभागातील चौदा सदस्य उपस्थित होते.



आषाढी एकादशी कार्यक्रम



दिवाळी श्रमपरिहार व पूजन

❊ **आषाढी एकादशी कार्यक्रम –** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने अभंग गायनाचा कार्यक्रम विभागात झाला. त्याला जोडून विभागातील सदस्या शुभदा कुलकर्णी यांचा मुलगा श्रेयस कुलकर्णी (इ. ५ वी) याने अर्ध्या तासाचे कीर्तन केले.

❊ **दिवाळी श्रमपरिहार व पूजन –** सौर कार्तिक ४ शके १९४६, शनिवार दिनांक २६ ऑक्टोबर रोजी विभागाचा यंत्रपूजन, सरस्वतीपूजन, लक्ष्मीपूजन, उपासना व दिवाळी अंकाचा श्रमपरिहार हा कार्यक्रम पार पडला. दिवाळी अंकाच्या निर्मिती पासून ते वितरणापर्यंत डि.टी.पी, संपादकीय, अर्थसंकलन व वितरण गटाने ८/१० तास थांबून गटकार्याने उत्तम काम केले. दिवाळी अंकांच्या या प्रक्रियेतून सर्व सदस्यांना आलेले नव-नवीन अनुभव, नवीन काय शिकायला मिळालं यावर गप्पा गोष्टी झाल्या. सर्व सदस्यांना एक छोटी भेट व स्नेहभोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. दिवाळी अंकाची छपाई करणारे प्रिंटर्स, गावोगावी अंक पोहोचवणारे वितरक आणि संपादक मंडळातील सदस्यही स्नेहभोजनासाठी उपस्थित होते.

❊ **आरोग्य योजना –** दरवर्षी विभागातील सदस्यांच्या आरोग्यविम्याचा हप्ता व आरोग्य तपासण्या यांसाठी यातील काही रक्कम विभागातर्फे दिली जाते. यासोबतच यावर्षी विभागात 'निरोगी' सदस्य बक्षीस योजना राबविण्यात आली. तीन महिन्यात वैद्यकीय कारणासाठी एकही रजा न घेणाऱ्या सदस्यांना रु. ५०० बक्षीस म्हणून देण्यात आले. ही योजना ९ महिने राबवली व त्यात १२ सदस्यांनी तीनही वेळेस ही बक्षिसे मिळविली.

❊ **बैठका –** वर्षभर महिन्याच्या दर सोमवारी विभागाची सहविचार समिती बैठक, महिन्यातल्या पहिल्या मंगळवारी मा. संचालकांबरोबर बैठक, तसेच विभागा अंतर्गत संपादकीय आणि व्यवस्थापकीय बैठका झाल्या.

❊ **वार्षिक मनोगत लेखन –** एप्रिल महिन्यात विभागातील सर्व सदस्यांनी वार्षिक मनोगत विभाग प्रमुखांकडे दिले त्यावर जोडी जोडीने सदस्यांची विभाग प्रमुखांबरोबर चर्चा झाली.

❊ **उपासना व प्रार्थना –** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी संपूर्ण उपासना व दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी संपूर्ण प्रार्थना म्हटली जाते. इतर सोमवारी शक्ती मंत्र, गायत्री मंत्राची उपासना होते तर अन्य दिवशी प्रार्थनेची दोन कडवी म्हटली जातात.

❊ ❊ ❊

पुढे पाहा ...

# छात्र प्रबोधन संकल्प – शके १९४७/२०२५–२६

**मासिक –** १. १० नित्य अंक, १ वासंतिक, १ विद्यार्थी विशेषांक व तीन दिवाळी अंकांचे प्रकाशन केले जाईल. (नित्य अंक, इंग्रजी, ग्रामीण)
४. दिनदर्शिका प्रकाशित केली जाईल.
५. सुबोध द्वैमासिकाचे प्रकाशन केले जाईल.
६. इंग्रजी द्वैमासिकाचे प्रकाशन केले जाईल.

**प्रकाशने –** १. अंकातील साहित्यातून ३ नवीन पुस्तके प्रकाशित केली जातील.
– १ पानी – १ संच – विज्ञान प्रयोग, कलाकृती
– ६ पानी १ संच – दीर्घ कथा
– एकांकिका, ललित – वैचारिक लेखसंग्रह, ललित लेखसंग्रह
२. आवश्यकतेनुसार पुस्तकांच्या आवृत्त्या/पुनर्मुद्रणे प्रकाशित केली जातील.
३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून एका पुस्तकाचे प्रकाशन
४. ३ नवीन इंग्रजी अनुवादित पुस्तके प्रकाशित केली जातील पैकी इंग्रजी १ पानी ललित लेखसंग्रह, इंग्रजी दीर्घ कथा, लेखमालेवरील एका पुस्तकाचे प्रकाशन

**विक्री यंत्रणा –** महाराष्ट्रभरात १२ विक्री केंद्रं नव्याने सुरू होतील. १० ठिकाणी पुस्तक प्रदर्शन व विक्री.

**योजना –** १. प्रबोधन दूत – ३ दिवसांची २ निवासी शिबिरे
२. प्रबोधन विकासिका योजना नवीन स्वरूपात, वर्षभरात ७ लेखकांशी ऑनलाइन गप्पा, प्रत्यक्ष एक दिवसीय ३ कार्यशाळा

**आधुनिक तंत्रज्ञानाची जोड –**
१. ERP सॉफ्टवेअरद्वारे पुस्तकसाठा व्यवस्थापनाची यंत्रणा कार्यन्वित होईल.
२. ॲप निर्मिती

**स्पर्धा –** १. अभिवाचन व हस्तलिखित स्पर्धांचे आयोजन
२. युवांसाठी लेखनस्पर्धा

**उपक्रम –** १. अभिवाचन व हस्तलिखित स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांसाठी ३ तासांची ऑनलाइन कार्यशाळा.
२. पुणे व परिसरात साहित्य मेळावे – ४० (सुमारे ७० ते ७५ विद्यार्थी) (एकूण १८०० विद्यार्थी)
३. २ एकदिवसीय साहित्य संमेलने (६०० विद्यार्थी) २ संस्थांच्या साहचर्याने
४. लेखन आणि अभिवाचन ३ दिवसांची निवासी कार्यशाळा होईल.
५. जोडीकार्य उपक्रमात १०० जोड्या सहभागी होतील.
६. २०० विद्यार्थ्यांद्वारा घरोघरी ग्रंथालय योजना राबवू.

**सदस्य उपक्रम –**
१. आषाढी एकादशी भजनोपासना २. गणेश आरती – विविध गुणदर्शन
३. दिवाळी – लक्ष्मीपूजन, यंत्रपूजन, उपासना व श्रमपरिहार ४. मातृभूमिपूजन ५. सहल
६. वर्षभरात २ कार्यशाळा
७. विभागातील सदस्यांसाठी आरोग्य संरक्षण, संवर्धन योजना केली जाईल.
८. वर्षभरात १ कार्यशाळा, मानसिक स्वास्थ्यावर ३ व्याख्याने योजली जातील.

**प्रतिसादासाठी जाहीर आवाहन**

१. नित्य व दिवाळी अंकांसाठी मराठी व इंग्रजी भाषेतील दर्जेदार लेखन आपण पाठवू शकाल. लेखक सुचवू शकाल.
२. विविध प्रकाशने अधिकाधिक जणांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण मदत करू शकाल. भेटवस्तू म्हणूनही आपल्या कार्यक्रमामध्ये ही प्रकाशने देऊ शकाल
३. आपल्या संपर्कातील विद्यार्थी व अध्यापकांना उपक्रमामध्ये सहभागाचे आवाहन करू शकाल तसेच हे उपक्रम अनेकांपर्यंत पोहोचावेत. म्हणून अर्थसाहाय्य देऊ शकाल. (संपर्क क्र. : ०२० २४२०७१७५/२४०)
४.महाराष्ट्रभरात ज्ञान प्रबोधिनी प्रकाशनांची विक्री केंद्रे नव्याने सुरू करण्यासाठी आपण स्वत: किंवा आपल्या परिचयातील इच्छूक व्यक्तींना आवाहन करू शकाल.